# “महाराष्ट्रातील जलसिंचन एक अभ्यास“

**प्रा.डॉ.तवार ए.टी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**सहा.प्रा. मडावी ए.डी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना :-**

मानवी जिवनात इतर संपत्तीपेक्षा निसर्गात दिलेली जलसंपत्ती अत्यंत महत्वपुर्ण आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाला गती येण्यास पाणी आणी जमीनीचा संयोग हेच घटक जबाबदार आहे शेती विकासातून ग्रामिण विकासाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न करणारे एक राज्य म्हणून महाराष्ट्र भारतात आघाडीवर आहे. शेती विकास, ग्रामिण विकास आणि पर्यायाने सामाजीक विकासाची दृष्टी समोर ठेवून नियोजनाद्वारे प्रयत्न करणाऱ्या भारतातील काही राज्यापैकी महाराष्ट्र राज्य हे एक आहे. महाराष्ट्रात आर्थिक सुबत्ता व स्वावलंबन आणण्यासाठी शेती क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. पाणी हा शेतीसाठी अविभाज्य असा घटक आहे. पाण्याशिवाय शेतीच्या विकासाचा विचार करता येत नाही. ज्या प्रदेशात पाऊस अनियमित, अनिश्चित आणि कमी पडतो अशा प्रदेशात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक ठरते. जलसंपत्तीचे नियोजन सामाजिक, आर्थिक व वैज्ञानीक दृष्टीने करावे हे संत तुकारामांनी सांगुन ठेवले आहे. व्यक्ती आणि समाज यांची प्रगती सर्व अंगाने समृध्दीकडे नेणारी सर्वात मोठी पूरक शक्ती म्हणून जलसंपत्तीला महत्व दिल्या जाते.

शेतीच्या विकासासाठी सिंचनाच्या सोयीची अत्यंत आवश्यकता असते महाराष्ट्रात सन २००८-२००९ मध्ये सिंचनाखालील एकुन क्षेत्र ३९.७० टक्के एवढे होते. एकुण लागवडीखालील जमिनीचे सिंचित जमिनीशी हे प्रमाण १७.७ टक्के एवढे आहे. भारताचा विचार केल्यास हे प्रमाण ३८ टक्के आहे. या वरून असे लक्षात येते की महाराष्ट्रामध्ये सिंचनाच्या सोयींचा फारसा विकास झालेला नाही. सन १९९०-९१ या साला पासून महाराष्ट्रात सिंचित जमिनीचे एकुन लागवडीखालील जमिनीशी असलेली टक्केवारी 15 ते १७ टक्के असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ सिंचनाच्या सुविधांच्या संदर्भात बऱ्याच काळापासून जैसे थे परिस्थिती आहे. महाराष्ट्राची सिंचनाची क्षमता १२६ लाख हेक्टर एवढी आहे परंतू या पर्यंत पोहचण्यास अजुन बराच पल्ला गाठणे बाकी आहे. महाराष्ट्रात जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी शासनाने अनेक मोठे, माध्यम व लघु पाठ बंधारे प्रकल्प हाती घेतले आहेत. केंद्र सरकारने ग्रामीण भागात सन २००५-२००६ ते २००८-२००९ या काळात विकास करण्यासाठी भारत निर्माण योजना जाहीर केली या योजने मार्फत महाराष्ट्रासाठी

१८.४५ लाख हेक्टरचे लक्ष ठरवून देण्यात आले होते. सन २००५-०६ मध्ये ०.९३ लाख हेक्टर एवढी अतिरीक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली.

**महाराष्ट्रातील पूर्ण झालेले पाटबंधारे प्रकल्प, त्यांची निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र**
**(30 जून,2014 रोजी)**

(हजार हेक्टरात)

| अ.क्र. | जलसिंचन प्रकल्प | पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या ** | पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता ** | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र * |
|---|---|---|---|---|
| 1 | मोठे | 105 | 2584.97 | 2,122.97 |
| 2 | मध्यम | 301 | 898.02 | 456.33 |
| 3 | लघु व उपसा | 3,481 | 1319.88 | 680.34 |
| 4 | **एकुण** | **3887** | **4,802.87** | **3259.64** |

** जून 2013 अखेर

* प्रत्यक्ष सिचित क्षेत्र 2013-2014

आधार - पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

वरिल तक्त्यातील माहितीवरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील निर्मान सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र या मध्ये तफावत आहे. जून २०१३ पर्यंत महाराष्ट्रात प्रकल्पांची संख्या ३८८७ एवढी होती आणि पूर्ण झालेल्या प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता ४,८०२.८७ हजार हेक्टर एवढी होती परंतू २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र 35259-64 हजार हेक्टर होती. मोठे, मध्यम व लघु व उपसा अशा तिन्ही जलसिंचन प्रकल्पांद्वारे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र कमी असल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्प गतिने पूर्ण करण्यासाठी शासनाने फेब्रुवारी १९९६ ते ऑगस्ट १९९८ या काळात पुढील पाच सिंचन विकास महामंडळाची स्थापना केली आहे.

1) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
2) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ
3) तापी पाटबंधारे विकास महामंडळ
4) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ
5) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

या महामंडळाचा तपशील पूढील तक्त्यात दिला आहे.

| जलसिंचन प्रकल्प | महाराष्ट्रकृष्णा खोरे विकास महामंडळ | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ | तापी पाटबंधारे विकास महामंडळ | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| मोठे | 19 | 4 | 10 | 16 | 24 | 73 |
| मध्यम | 33 | 11 | 25 | 16 | 51 | 136 |
| लघु व उपसा | 265 | 81 | 98 | 207 | 191 | 842 |
| **एकुण** | **317** | **96** | **133** | **239** | **266** | **1,051** |

आधार - महा.आ.पाहणी -2008-09

महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० ते ८५ टक्के शेती मोसमी पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे एकुन लागवडीखालील क्षेत्र पैकी केवळ १६.४८ टक्के क्षेत्र हे सिंचनाखाली आहे. महाराष्ट्रातील जलसिंचनाच्या साधनांमध्ये प्रामुख्याने कालवे, तळी, सरोवर,पाझर तलाव, विहिरी, उपसा सिंचन, कुपनलिका इत्यादींचा समावेश होतो. ठिबक सिंचनात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य असून संपूर्ण भारताच्या ६० टक्के ठिबक सिंचन एकटयामहाराष्ट्रात केले जाते. महाराष्ट्रातील शेतीचे क्षेत्र, जनतेची कृषीवरील निर्भरता आणि कृषीमालावर आधारीत उद्योग यांचे महत्व पाहता प्रामुख्याने कृष्णा, भीमा, गोदावरी, तापी, वर्धा वैनगंगा या नदयांच्या खोऱ्यात लहान मोठया सिंचन प्रकल्प योजना कार्यान्वीत आहेत पाण्याचा योग्य वापर करून महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जमिन सिंचनाखाली आसणे आवश्यक आहे. तसेच माहराष्ट्रातील जलसिंचनाचा प्रादेशिक समतोल साधने आवश्यक आहे. राज्याच्या स्थापनेनंतर सिंचन धोरण व कार्यपध्दती ठरविण्यासाठी आवश्यकतेनुसार समित्या व आयोग यांची नेमणूक करण्यात आली त्यांच्या महत्वपूर्ण शिफारशींचा तपशील पुढीलप्रमाणे.

१) **स.गो.बर्वे आयोग (१९६२) :**

या आयोगाने ४५ तालुके अवर्षण प्रवण म्हणून जाहीर केले. तसेच सर्व पाटबंधारे योजना १९८० पूर्वी पूर्ण करण्यात यावे असे सूचविले. तसेच सिंचनाचा विकास कालावधी हा बांधकाम सुरु झाल्यापासून ८ वष किंवा सिंचनास सुरुवात झाल्यापासून ५ वर्ष इतका असावा.

२) **अवर्षण प्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिती ( सुकथनकर १९७३) :**

१९७२ ते ७४ मधील भिषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हि समिती स्थापन करण्यात आली. या समितीने राज्यातील ८३ तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रात समावेश करण्याचे सुचविले. महाराष्ट्रातील १/३ आवर्षण प्रवण क्षेत्राच्या पाणी विषयक गरजांची चाननी या अहवालात झाली.

३) **सिंचन व्यवस्थापनाबाबत उच्चधिकारी समिती -१९८१ :**

या समितीने जलसंपत्तीच्या कार्यक्षम वापररासाठी राज्यस्तर स्वायत्त महामंडळाची रचना असावी. सिंचन क्षमता ६० हजार हेक्टर पेक्षा अधिक असणाऱ्या प्रकल्पापैकी स्वतंत्र स्वायत्त प्रकल्पस्तरीय प्राधिकरण निर्माण करावे असे सुचविले. विदर्भात रब्बी पाणी वापर वाढविण्यासाठी ब्लॉक सिंचन पध्दतीचा वापर सुरु करण्यास सुचविले.

४) **डॉ. सुब्रम्हण्यम समिती (१९८४) :**

या समितीने आपला अहवाल १९८७मध्ये सरकारला सादर केला. एकुन ९४ तालुके अवर्षण प्रवण आहेत असे या समितीने सुचविले.

५) **प्रादेशिक अनुशेष विषयक दांडेकर समिती ( १९८४) :**

राज्याच्या सर्वच प्रदेशातील सिंचनाबाबतची अनुशेष मोजणी तालुका पातळीवर करणे आवश्यक आहे असे सुचविले. वेगवेगळया पिकांखालील असलेल्या सिंचन क्षेत्राची मोजणी करण्यासाठी रब्बी समतुल्य क्षेत्र संकल्पना स्विकारण्यात सांगीतले.

६) **पाणी संस्था :**

राज्यातील सर्व पाटबंधारे प्रकल्याचे सिंचन व्यवस्थापन करण्यासाठी पाणी वापर संस्था स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने जुलै 2001 मध्ये घेतला आहे.

7) **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 :**

प्राधिकरणाची स्थापना ऑगस्ट 2005 मध्ये करण्यात आले. या अधिनियमामध्ये जलसंपत्तीचे व्यवस्थापन

आणि कृषी, उदयाग, घरगुती व इतर प्रयोजनासाठीच्या पाण्याचे दर निश्चित करण्याची हमी देण्यात आली.

**8) राज्यजलनिती :**

महाराष्ट्र सरकारने जुलै २००३ मध्ये राज्य जलनिती जाहीर केली. या नुसार नदया आणि लगतच्या जमीनी वरील अपूऱ्या जलसाधनांचा योग्य वापर याची हमी महाराष्ट्र सरकार तर्फे देण्यात आली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात जलसिंचनाचे बिटीशांचे जे धोरण होते तेच धोरण स्विकारल्या गेले. त्यामध्ये वेळेनुसार बदलही करण्यात आले. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसून येते की, माहराष्ट्राच्या सर्व प्रदेशात पर्जन्यमान सारखे आढळून येत नाही विविध प्रदेशात पर्जन्यमानाच्या बाबत वेगळेपणा दिसून येतो. पश्चिम घाट आणि कोकण पट्टीत सर्वात जास्त पाऊस पडतो तर विदर्भ आणी मराठवाडा या प्रदेशात कमी पाऊस पडतो. म्हणून महाराष्ट्रात जलसिंचन व्यवस्थेला फार महत्व आहे.

**संदर्भ :**


1) महाराष्ट्र वार्षिकी(2012) - संपादक - तुकाराम जाधव
2) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - प्रा.सौ.जाधव राजेश्री अप्पाराव
3) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - 2014-15
4) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यीकी - 2014
5) http://mr.vikaspedia.in/agriculture
6) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. वसुधा पुरोहित